RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२४)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LX OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६०.**

**महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यात सुधारणा करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९७८ वर महाराष्ट्र १४ अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ याच्या कलम १४ मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु, अपिलकाराला, त्याची तशी इच्छा असेल तर, कोणत्याही अध्यापकीय किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या संघाचा किंवा संघटनेचा पदाधिकारी असलेल्या त्याच्या पसंतीच्या इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत संचालक किंवा न्यायाधिकरण यांच्यासमोर प्रतिनिधित्व करण्याची परवानगी राहील:

परंतु, आणखी असे की, अपिलकाराचे प्रतिनिधित्व करणारी अशी व्यक्ती किंवा पदाधिकारी ज्या शाळेमध्ये नोकरी करीत असेल अशा शाळेच्या व्यवस्थापनाची कोणतीही परवानगी अशा प्रतिनिधित्वासाठी आवश्यक असणार नाही.".

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ याच्या कलम १४ मधील विद्यमान तरतुदीनुसार अपिलकाराला कोणत्याही अध्यापकीय किंवा अध्यापकेतर कर्मचारी संघटनेच्या किंवा संघाच्या पदाधिकाऱ्यामार्फत प्रतिनिधित्व करण्याची अनुमती नाही.

ही पूर्व-शर्त खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधाच्या विरुद्ध आहे आणि यामुळे खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा या अधिनियमाचा जो मूळ उद्देश आहे तो विफल होतो.

अपिलकाराला स्वतःला विवादाच्या विधिविषयक बाबींसंबंधीची पुरेशी माहिती नसते आणि संबद्ध कायद्याचे अद्ययावत ज्ञान नसते. याउलट कर्मचारी संघटनेच्या किंवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना कायद्याच्या बाबींविषयी नीट माहिती असते आणि संबंधित खंड, नियम व विनियम यांचे सविस्तर आणि अद्ययावत ज्ञान असते. तसेच त्यांच्या संघटनेशी किंवा संघाशी संबंधित विविध कायदेशीर बाबी हाताळाव्या लागत असल्यामुळे अशा विवादाची हाताळणी करण्याचा पूर्वीचा अनुभव देखील असतो.

श्रमिक संघाच्या किंवा श्रमिक संघाच्या महासंघाच्या पदाधिकाऱ्यांमार्फत पक्षकारांना असे प्रतिनिधित्व करू देण्याची परवानगी औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत देण्यात आली आहे. त्यामुळे खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने या अधिनियमात तत्सम तरतुदी करणे आवश्यक आहे.

पूर्वोक्त उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

म्हणून हे विधेयक सादर केले आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १७ जून २०२५.

**सुधीर मुनगंटीवर,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.